महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

ई-मेल -vinayak.jakhlekar@nic.in

---

क्रमांक:एफएसटी-०३/२४/प्र.क्र.५०/फ-४ दिनांक: १२ जुलै, २०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय**:- सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार सुधारित वेतन निश्चिती करून त्यानुषंगाने सुधारित वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

**संदर्भ**:- आपले पत्र क्र.कक्ष-१० (२)/आस्था/एक/प्र.क्र.१६६ (१६-१७)/२०२२-२३/२१४, दि.२०.१२.२०२३

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देणे व पदोन्नतीबाबतचे निकष सारखे असल्यामुळे वित्त विभाग, अधिसूचना दि.०३.०२.२०२३ नुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेणा-या कर्मचा-यास वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील, अशी धारणा व्यक्त करून याबाबत शासन स्तरावरून मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. त्यानुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहेत.

*वित्त विभागाच्या दि.०३.०२.२०२३ रोजीच्याची अधिसूचना ज्या संवर्गात नामनिर्देशन आणि पदोन्नतीने नियुक्ती देण्यात येते; अशा संवर्गात दिनांक १ जानेवारी, २००६ पूर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या तसेच दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी अथवा त्यानंतर पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती नामनिर्देशनाने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा (Entry Pay) कमी वेतनावर होत असल्यास; अशा कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ शासन (अधिसूचना वित्त विभाग दि. २२ एप्रिल, २००९) मधील जोडपत्र-३ मध्ये नमूद सेवाप्रवेश वेतनाइतक्या वेतनावर (Entry Pay) करण्यात यावी आणि त्याबाबत या नियमांमधील नियम ७ आणि १३ मध्ये सुधारणा करण्याबाबतची आहे.*

*सदर अधिसूचनेमध्ये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांना वरील प्रमाणे वेतननिश्चितीचे लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले नाहीत. सबब, आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेणाऱ्या कर्मचा-यास वित्त विभागाच्या दि.०३.०२.२०२३ नुसार वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय करता येणार नाही.*

२. सदर पत्र वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(वि. श. जाखलेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- निवड नस्ती (फ-४)

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर- ४४०००१**
email-apccfhrmadmn@gmail.com दुरध्वनी-०७१२-२५५६७७३

---

**ईमेलद्वारे** क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१६६(१६-१७)/भाग २/६५८/
नागपूर-४४० ००१ दिनांक १०/०८/२०२४

प्रति,
वनसंरक्षक (प्रादेशिक)
यवतमाळ

विषयः-सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार सुधारित वेतन निश्चिती करून त्यानुषंगाने सुधारित वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

संदर्भः-१)आपलेकडील पत्र क्र. वसं(य)/कक्ष-८/आस्था/ले-२/८८२/२०२३-२४ दिनांक १०/११/२०२३
२) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१६६(१६-१७) /२०२२-२३/२१४ दिनांक २०/१२/२०२३
३)शासन पत्र क्र. एफएसटी-०३/२४/प्र.क्र.५०/फ-४ दिनांक १२/०७/२०२४

विषयांकीत प्रकरणी आपलेकडील संदर्भीय पत्र दिनांक १०/११/२०२३ अन्वये वित्त विभाग, अधिसुचना, दिनांक ०३/०२/२०२३ नुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेणा-या कर्मचा-यास वेतन निश्चितीचा लाभ देय आहे किंवा कसे? या बाबत मार्गदर्शन मिळणेस विनंती केली होती. त्यानुषंगाने या कार्यालयाचे पत्र दि. २०/१२/२०२३ (संदर्भ २) अन्वये शासनाकडुन मार्गदर्शन मिळणेस विनंती केली होती. त्यावर शासन पत्र दिनांक १२/०७/२०२४ (संदर्भ ३) अन्वये मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.(प्रत संलग्न). त्यानुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेणा-या कर्मचा-यास वित्त विभागाच्या दि. ०३/०२/२०२३ नुसार वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय करता येणार नाही.

२. सदर शासन पत्रातील तरतुदी विचारात घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

**सहपत्र**:वरीलप्रमाणे

(गिन्नी सिंह)
उपवनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)

**प्रतिलीपी**: (संदर्भ १ ,२ व ३ सह माहिती व उचित कार्यवाहीस्तव)
१)मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
२)वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
३) प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१३